सदैव तत्पर, सदैव मदतीस

Tel :- 022- 22620295
E mail ID - azadmaidanps@gmail.com.in

सत्यमेव जयते

**Azad Maidan Police Station
Esplanade Bldg, Gr.Floor, Near BMC Head Office,Mahapalika Marg, Mumbai-01**

**प्रेस नोट** **दिंनाक:-१७/०४/२०२५**

**आझाद मैदान पोलीस ठाणे,मुंबई येथील ३७ वर्षापूर्वीच्या खुन्हयांच्या प्रयत्नातील (डी कंपनी हस्तकास ) फरारी आरोपीस अटक केलेबाबत...**

———————————————

फिर्यादी नामे श्री.हरेश कमलदास केशवाणी,वय-२३ वर्ष,धंदा-चालक,रा.ठी.उल्हासनगर,जि.ठाणे हे दिनांक २८/११/१९८८ रोजी गोपाळ रजवानी,अग्रीसेनेचे अध्यक्ष यांच्या वाहनावर चालक म्हणुन असताना ग्रिण्डलेन्स बॅके जवळील फुटपाथ,युनिव्हर्सिटी पथ,मुंबई येथुन जात असताना नमुद गुन्हयातील अटक आरोपीतांनी आपआपसात संगणमत करून गोपाळ रजवानी, यांना पिस्टलने गोळीबार करून खुन करण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी यांच्या फिर्यादी वरुन आझाद मैदान पोलीस ठाणे गु.र.क्र. ७१३/१९८८ कलम ३०७,११४,१२०(ब),भादवि सह शस्त्र अधिनीयम कलम ३,२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वर नमुद गुन्हयातील आरोपी नामे मंगेश गोवींद मोरे,उर्फ मंगेश मांजरेकर,हा नमुद गुन्हयाच्या सुनावणीकामी हजर राहत नसल्याने त्याच्या विरोधात मा.सत्र न्यायालय कोर्ट क्र.३० यांनी स्थायी अजामीनपात्र वारंट काढले आहे. त्याकरीता पोलीस पथक आरोपीताचा शोध घेण्याकरीता त्याचा त्याच्या राहत्या व मुळ पत्यावर वारंवार शोध घेतला परंतु तो स्वत:चे अस्तित्व लपवुन व घरदार सर्व सोडुन नातेवाईकासोबत संपर्क सोडुन वेगवेगळया ठिकाणी थोडे दिवस राहुन पुन्हा त्याचा राहण्याचा पत्ता बदलत असल्याने त्यामुळे नमुद वारंटची बजावणी करता येत नव्हती.

नमुदची घटना ही डि.कंपनीच्या गंगस्टर आरोपीतांची अल्याने त्याचे गांभीर्य लक्षात घेवुन मा.वरिष्ठांनी पो.उ.नि. रामप्रसाद चंदवाडे व तडीपार पथकास दिलेल्या सुचनाप्रमाणे नमुद पथकाने कसोशीने गुप्त बातमीदार सक्रिय करून नमूद फरारी आरोपीबाबत माहिती प्राप्त केली असता, आरोपीत हा जास्त दिवस एकाच ठिकाणी राहत नसल्याबाबत माहिती मिळाली त्यामूळे आरोपीचा शोध घेणे जास्त जिकिरीचे झाले.तरी देखील तडीपार पथकाने हार न मानता चिकाटीने वारंवार माहिती प्राप्त केली असता तो गाव नानेमाची वाकी बुद्रुक ता.महाड जि.रायगड याठिकाणी १५ किलोमीटर आत खूप मोठया डोंगराळ भागात ज्याठिकाणी येण्याजाण्यासाठी अडगळीचा रस्ता आहे व मोबाईल नेटवर्क नसल्यामूळे पोलीस पथकाचा आपआपसांत संपर्क होत नव्हता .तरी देखील शर्यतीने आरोपीला सापळा रचून ताब्यात घेवून नमूद गुन्हयांत आरोपीतास फेरअटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त, मुंबई, श्री विवेक फणसळकर सो,मा. विशेष पोलीस आयुक्त, मुंबई श्री देवेन भारती सो,मा. पोलीस सह आयुक्त, (का व सु) मुंबई,श्री. सत्य नारायण सो ,मा. दक्षिण प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त,मुंबई श्री अभिनव देशमुख सो, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०१ मुंबई,मा.श्री प्रविण मुंढे सो, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त आझाद मैदान विभाग, श्रीमती प्रेरणा कट्टटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, आझाद मैदान पोलीस ठाणे , श्री दिपक कृष्णा दळवी, पोलीस निरीक्षक, श्री ज्ञानेश्वर आव्हाड, पोलीस उपनिरीक्षक रामप्रसाद चंदवाडे, स.फौ.संदीप लोखंडे, पो.शि.क्र.११०८७९ कांबळे, पो.शि.क्र.१३०३६० बोरसे,पो.शि.क्र. १३०३७३ पाटील, मपोशि कं. १४०८७०. झुंजरे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

-----------------------------------------------